World Wide Journal of Multidisciplinary Research and Development




WWJMRD 2019; 5(7): 68-69
www.wwjmrd.com
*International Journal*
*Peer Reviewed Journal*
*Refereed Journal*
*Indexed Journal*
*Impact Factor MJIF: 4.25*
E-ISSN: 2454-6615

**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

**Correspondence:**
**विश्वास गोरखनाथ वळवी**
(संशोधक विद्यार्थी)
कबचौ उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ
जळगाव (महाराष्ट्र)

# ''पवित्रशास्त्र आणि त्याच्या आधिकार''

**विश्वास गोरखनाथ वळवी**

**Abstract**
John State says, "Faith and obedience to the authority of the Scriptures are a necessary consequence of Christ's acceptance of divine sovereignty." To deny authority is to rebel against the authority of the Lord. Such an act would not be innocent. No, a Christian writer will survive without taking Christian literature seriously. The authority of God's Word is that God stands firmly behind every sentence, every context, every doctrine, every command, every promise. Must be, must be supplementary of science, must be the answer to every question of society, only then it can be called Christian literature.

**Keywords:** Bible, God, Scriptures, Faith, Salvation, Christ, Obedience, Authority, Scripture, New Testament

**प्रस्तावना:**
जॉन स्टॉट म्हणतात ''पवित्र शास्त्राच्या अधिकारावर विश्‍वास ठेवणे व त्यास अधीन होणे हे ख्रिस्ताचे दैवत्वाचे प्रभुत्व स्विकारण्याचा आवश्यक परिणाम आहे.'' ख्रिस्ती साहित्य लिहीत असतांना पवित्रशास्त्र तर मूलाधार आहेच पण ख्रिस्ताचे दैवत आणि प्रभूत्वावर विश्‍वास प्रबळ हवा.त्यामुळे प्रो कोहेलर म्हणता लिहितात ''परमेश्‍वराचा अधिकार नाकारणे म्हणजे परमेश्‍वराच्या अधिकाराविरुद्ध बंड करणे.अशा कृतीस शिक्षा झाल्याशिवाय राहणार नाही.कोणताही ख्रिस्ती लेखक ख्रिस्ती साहित्य लेखन गंभीर घेतल्याशिवाय राहणार नाही. ट्युरेटीन रीफॉर्मड स्कॉलर आपल्या भाष्यातून संशोधनाचे महत्व विशद करतात ते म्हणतात ''नविन करार हा ख्रिस्ताची शेवटची इच्छा व शेवटचा करार आहे.जर मृत व्यक्तीच्या इच्छापत्रातून काहीही बदलू शकत नाही तर ख्रिस्ताच्या अंतिम करारात व इच्छेत कोणीही भर घालू नये.(गलती. ३.१५ ; प्रगटीकरण२२.१८-१९.) तसेच.एल.बी.सी आपल्या लेखात बायबल संबंधी लिहिते ''तारण देणाऱ्या ज्ञानासाठी विश्‍वासासाठी व आज्ञापालनासाठी पवित्र शास्त्र हे एकमात्र पुरेसे, निश्‍चित व कधी न चुकणारे प्रमाण आहे.त्यामुळे ख्रिस्ती साहित्य हे अचूक आणि पवित्रशास्त्राचे प्रकटीकरण पूर्ण करणारे असायला हवे.

देवाचे वचन हे ईश्‍वरप्रेरीत,अचूक व सिध्द आहे.म्हणुन ते अधिकृत आहे.देवाने हे अधिकारवाणीने दिलेले आहे.जेव्हा शास्त्र बोलते तेव्हा देव बोलतो देवाने शास्त्रामध्ये चेतावन्या व आज्ञा आम्हाकरिता दिलेल्या आहेत त्या सार्वभौम अधिकाराने दिलेले आहेत.बायबलचा अधिकार मानवी ज्ञानापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे,बायबलचे ज्ञान मानवी तर्कापेक्षा सर्वश्रेष्ठ आहे.मानवी तर्क-वितर्काने तारण होत नाही.बायबल अधिकार विज्ञानापेक्षा श्रेष्ठ आहे.मानवाची व विश्‍वासाची निर्मिती आणि सार्वकालिकते बद्दल केवळ पवित्र शास्त्र शिकविते,सायन्स शिकवित नाही.नीतीवचन.९.१०,बायबलचा अधिकार मंडळीच्या वडिलापेक्षा (मंडळींचे पिता) श्रेष्ठ आहे.बायबलचा अधिकार मंडळीच्या सभासदांवर अधिकृत आहे;मंडळया चुकाविरहित व पापविरहित नाहि पण देवाचे वचन चुकाविरहित वा पापविरहित आहे.बायबलचे अधिकार मंडळीच्या मतांगिकार ,विधी ,आचार ,विचार ,संस्कार यापेक्षाहि श्रेष्ठ आहे.बायबलचे अधिकार हे मानवी अनुभवांपेक्षाही श्रेष्ठ आहे. योहान १.१८ (उदा. मी देवाला पाहिले).बायबलचे अधिकार हे मानवी भावनांपेक्षा श्रेष्ठ आहे.उदा. मला असे वाटले,देव बोलला.बायबलचे अधिकार आपल्या साक्षेपेक्षा श्रेष्ठ आहे.देवाच्या वचनाचा अधिकार म्हणजे शास्त्रातील प्रत्येक वाक्याच्यामागे, प्रत्येक संदर्भामागे, प्रत्येक सिद्धान्तामागे, प्रत्येक आज्ञेच्यामागे, प्रत्येक अभिवचानामागे देव ठामपणे त्याचा अधिकाराने उभा आहे.त्यामुळे ख्रिस्ती साहित्य हे देखील जगीक ज्ञानाच्या भंडारापेक्षा श्रेष्ठ असले पाहिजे,विज्ञानाला पूरक असले पाहिजे,समाजाच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर

देणारे पाहिजे.तेव्हाच त्याला ख्रिस्ती साहित्य म्हणता येईल

**संदर्भसूची:-**

1. गलती. ३.१५.नवा करार.पवित्रशास्त्र
2. प्रगटीकरण२२.१८-१९. नवा करार.पवित्रशास्त्र
3. योहान १.१८.नवा करार.पवित्रशास्त्र